महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

शुक्रवार ❖ ०३ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १८९ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्यातील शेतकऱ्यांना सरकारचा दिलासा

**नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर आज गुरुवारी (२ जानेवारी) मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. केवळ उपमुख्यमंत्री अजित पवार अनुपस्थित होते. महत्त्वाची बाब म्हणजे आठवडा उलटल्यानंतरही काही मंत्र्यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही, त्यामुळेच ही बैठक महत्त्वाची मानली जात होती. तसेच वाल्मिक कराड प्रकरणामुळे प्रसिद्ध झालेले धनंजय मुंडे हेही या बैठकीला उपस्थित होते. महामंडळाच्या आजच्या किंवा पहिल्या बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.**




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

मुंबई : आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. आकारी पड जमिनी मूळ खातेदारांना परत करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० मध्ये सुधारणा करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे ४ हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार आहेत. यामुळे छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबतचे सुधारणा विधेयक मांडण्यास मंजूरी देण्यात आली.

**जुना कायदा काय होता?**

तगाई किंवा तत्सम महसूल न भरल्याने भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारीपड म्हणून शासन जमा करण्यात येतात. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षाच्या आत भरणा केल्यास मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर असा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद कायद्यात नव्हती. त्यामध्ये आता बदल करण्यात येणार आहे. अशा जमिनी प्रचलित बाजारमूल्याच्या २५% रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० मध्ये करण्यास मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली आहे. तसेच विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा**

आकारी पड जमिनींसंदर्भातील मोठा निर्णय फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने घेतल्याने छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार मुंबई बँकेतून

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज दुपारी १२ वाजता झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांना पगार आणि भत्ते देण्यासाठी मुंबई बँकेत वैयक्तिक खाती उघडण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. मुंबै बँक हीच भाजप नेते प्रवीण दरेकर यांच्याशी संबंधित असल्याने विरोधक टीकेचा मुद्दा उपस्थित करण्याची शक्यता आहे. मात्र या निर्णयानंतर मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी राज्य सरकारचे आभार मानले. या संदर्भात ते म्हणाले की, ज्या जिल्हा बँकांना सलग अ वर्ग आहे, त्यांना शासनाच्या व्यवहारांना परवानगी असते. या निकषात मुंबई जिल्हा बँक येत असल्यामुळे आणि अनेक सरकारी योजनांना, उपक्रमांना मुंबई जिल्हा बँकेची मदत झाली आहे, असे दरेकर यांच्याकडून सांगण्यात आले.

## आम्हाला लोकं फोडायची असती तर आम्हीही फोडले असते

### आमदार किसन कथोरे



"आम्हाला जर लोक फोडायचे असतील तर आम्हीही बरेच घेऊ. ते उपमुख्यमंत्र्यांकडे घेऊन जातात. आम्ही मुख्यमंत्र्यांकडून घेऊन जाऊ
- **किसन कथोरे**
**आमदार मुरबाड**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**बदलापूर** : आम्हाला जर लोक फोडायचे असते तर आम्हीही बरेच घेऊ. ते उपमुख्यमंत्र्यांकडे घेऊन जातात आम्ही मुख्यमंत्र्यांकडे घेऊन नेऊ, अशा शब्दात आमदार किसन कथोरे यांनी शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. दोनच दिवसांपूर्वी भाजपचे माजी नगरसेवक हेमंत चतुरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्या पार्श्वभूमीवर कथोरे यांचे वक्तव्य महत्वाचे मानले जाते. विधानसभा निवडणुकीपासून आमदार किसन कथोरे आणि शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्यात संघर्ष सुरू आहे. एकमेकांवर सातत्याने ते टीकास्त्र सोडतात.

कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे भाजपचे माजी नगरसेवक हेमंत चतुरे यांनी वामन म्हात्रे आयोजीत आगरी महोत्सवाच्या दरम्यान शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी हा प्रवेश घडवून आणला. त्यातच दोन दिवसांपूर्वी म्हात्रे यांनी चतुरे यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेटही घालून दिली. चतुरे हे भाजपचे बदलापूर गावातील नगरसेवक होते. याच प्रभागात भाजपचे आमदार किसन कथोरे यांचेही निवासस्थान आहे. त्यामुळे चतुरे यांचा प्रवेश घडवून म्हात्रे यांनी कथोरे यांना शह दिल्याची चर्चा रंगली आहे. विधानसभा निवडणुकीत वामन म्हात्रे यांनी कथोरे यांना विरोध केल्याने त्यावेळी कथोरे यांनी शिवसेनेच्या उपशहरप्रमुखाला ऐन प्रचारात गळाला लावले होते. त्यामुळे महायुतीत फोडाफोडीचे राजकारण केले जात असल्याची चर्चा रंगली होती. त्यानंतर आता म्हात्रे यांनी चतुरेंच्या शिवसेना प्रवेशातून परतफेड केल्याचे बोलले जाते.

याच पार्श्वभूमीवर आमदार किसन कथोरे यांनी या प्रवेशावर आपले मत मांडले आहे. हेमंत चतुरे यांना भाजपातून निलंबीत करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी त्यांनी पक्षविरोधी काम केल्याने त्यांना निलंबीत केले होते. त्यांची हकालपट्टी करण्यात आली होती. त्यामुळे त्यांना कुठेही पर्याय नसल्याने ते तिकडे गेले असावेत अशी प्रतिक्रिया आमदार किसन कथोरे यांनी दिली. त्याचवेळी बोलताना त्यांनी पक्षप्रवेश करणाऱ्यांना इशाराही दिला आहे.

## पनवेलमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : राज्यातील पहिले 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' पनवेल शहरामधील भारतीय जनता पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात बुधवारी सुरू करण्यात आला. माजी खा. रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कक्ष सुरु करण्यात आला. यावेळी भाजपचे आ. प्रशांत ठाकूर व आ. महेश बालदी हे सुद्धा उपस्थित होते. यावेळी रामेश्वर नाईक यांनी पनवेल प्रमाणे राज्यभरात असे वैद्यकीय सहाय्य कक्ष उभारणार असल्याची माहिती दिली. आ. ठाकूर व बालदी यांनी पनवेल शहरातील रुग्णांना वैद्यकीय सहाय्यता मिळावी यासाठी सरकार दरबारी पाठपुरावा केल्यामुळे हा कक्ष सुरू होत असल्याचे यावेळी रामेश्वर नाईक म्हणाले. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध वैद्यकीय योजना तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा मदतनिधी पनवेल व उरण तालुक्यातील आदिवासी, गरीब, गरजू नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या निरोगी आणि दीर्घायु जीवनासाठी हे कक्ष उभारण्यात आले आहे. यावेळी भाजपचे स्थानिक नेते वाय. टी. देशमुख, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, भाजपचे पदाधिकारी अरुण भगत, जयंत पगडे, चारुशीला घरत, अतुल पाटील, रवी भोईर, प्रवीण मोरे,ब्रिजेश पटेल,संदीप पाटील,सायली म्हात्रे, संतोष भोईर,प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, आनंद ढवळे, प्रभाकर जोशी व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

**महात्मा फुले जीवनदायी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व इतर योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा सरकारचा प्रामाणिक प्रयत्न आहे. संपूर्ण उपचार मोफत किंवा अत्यल्प दरात देण्याचा सरकारचा उद्देश आहे. त्यामुळे पनवेलमध्ये उभारलेले हे वैद्यकीय सहाय्यता कक्ष महत्वपूर्ण ठरणार आहे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे पोर्टल या कार्यालयासाठी उपलब्ध करून देणार आहेत.**
**- रामेश्वर नाईक, प्रमुख, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य कक्ष**

## कचरा प्रकल्पाला डोंबिवली ग्रामस्थांचा विरोध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रितिनिधी

**डोंबिवली** : जुनी डोंबिवलीत कल्याण डोंबिवली पालिकेकडून शास्त्रोक्त कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा प्रकल्प अलीकडेच पालिकेच्या घनकचरा विभागाने सुरू केला आहे. या प्रकल्पामुळे परिसरात दुर्गंधी पसरेल, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येईल, असे प्रश्न करत जुनी डोंबिवलीतील ग्रामस्थांनी या प्रकल्पाला विरोध केला आहे. बुधवारी या प्रकल्पाच्या ठिकाणी जमवून ग्रामस्थांनी आपला विरोध दर्शवला.

या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी बुधवारी सकाळी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड येणार असल्याची माहिती मिळाल्यावर जुनी डोंबिवलीतील ग्रामस्थ शास्त्रोक्त कचरा प्रकल्प प्रकल्प स्थळी जमा झाले होते. शंभर टन क्षमतेचा (टीपीडी) कचरा विल्हेवाट प्रकल्प जुनी डोंबिवलीत उभारण्यात आला आहे. कल्याण, डोंबिवली शहरांची वाढती लोकवस्ती, नागरिकरणाचा विचार करून पालिकेने त्या प्रभागातील कचरा त्या भागातच विल्हेवाट लावण्याचे नियोजन केले आहे. यामुळे कचऱ्याची वाहतूक, मनुष्यबळ, इंधन बचत होणार आहे. या प्रकल्पाच्या आजुबाजुला स्थानिकांच्या जमिनी, निवासी वस्ती आहे. हा प्रकल्प योग्य नियोजनाने चालविला नाहीतर या भागात दुर्गंधी पसरेल. नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होतील, अशी भीती रहिवाशांनी व्यक्त केली.

> **नागरिकांनी विकास कामांना विरोध न करता शहराच्या प्रगतीचा विचार करून सकारात्मक दृष्टीकोनातून प्रकल्पाकडे पाहावे. जुनी डोंबिवलीतील प्रकल्पाविषयी पालिका ग्रामस्थांचे म्हणणे, त्यांच्या सूचना ऐकून योग्य मार्ग काढण्यास तयार आहे.**
> **-डॉ. इंदुराणी जाखड, आयुक्त.**



पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड प्रकल्प स्थळी आल्यावर त्यांनी जुनी डोंबिवलीतील स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. आयुक्त डॉ. जाखड यांनी उपस्थित नागरिकांना सांगितले, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या प्रकल्पाची उभारणी केली आहे. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी या प्रकल्प स्थळाच्या आवश्यक तपासण्या करण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या काही अडचणी असतील तर त्यांच्या समस्या ऐकून घेण्यास प्रशासन तयार आहे. केवळ विरोधासाठी विरोध न करता नागरिकंनी चांगल्या विकास कामात अडथळा आणू नये.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचरा प्रकल्प राबविण्याच्या आरक्षित भूखंडावर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पात दररोज २५ टन कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती केली जाणार आहे. शहरात तयार होणाऱ्या कचऱ्याचे योग्य नियोजन करणे पालिकेला शक्य होणार आहे. येणाऱ्या काळात हा प्रकल्प अधिकधिक अत्याधुनिक पध्दतीने चालविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, असे आयुक्त डॉ. जाखड यांनी सांगितले. ग्रामस्थांनी या प्रकल्पासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी ४ जानेवारी रोजी एका बैठकीचे आयोजन केले आहे.

## शहापूरात जिजाऊच्या रुग्णालयाचे लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीफ वार्ता
☐ प्रतिनिधी

काही माणसांचं जगणं दुसऱ्यांसाठीच असते, माझ्या भोंवताळच्या समाजातील दैनं, हे आपल दैनं मानून काम करणारी माणसं फार दुर्मिळ झाली आहेत. जिजाऊ सामाजिक, शैक्षणिक संस्थेचे आध्यक्ष निलेश सांबरे यांचे काम असेच आहे. त्याचे सामाजिक काम कौतुकास्पद तर आहेच मात्र दखल पात्र असेच आहे असे गौरवोदगार आमदार किसन कथोरे यांनी शहापूर येथे श्री भगवान सांबरे रुग्णालयच्या उदघाटना प्रसंगी केले.

जिजाऊ शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांनी शहापूर तालुक्यातील नागरिकांना मोफत रुग्णालय सुरू करण्याच्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली असून आज (दि. ०२)मान्यवरांच्या उपस्थितीत



लोकार्पण करण्यात आले.त्यावेळी आमदार किसन कथोरे बोलत होते.

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष निलेश सांबरे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शहापूर तालुक्यातील नागरिकांना शहापूरमध्ये मोफत अद्ययावत रुग्णालय सुरू करण्याचे आश्वासन दिले होते, त्याची आश्वासनपूर्ती केली असून आज (दि. ०३) विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रुग्णालयाचे लोकार्पण करण्यात आले.ठाणे येथील प्रख्यात डॉ. अनंत गित्ते यांचे शहापूर येथील क्रिस्टल केअर हॉस्पिटलचे हस्तांतरण करून जिजाऊ संचलित भगवान महादेव सांबरे -क्रिस्टल केअर या नावे नव्याने सुरु करण्यात आलेल्या हॉस्पिटलचे मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

यावेळी मुरबाडचे आमदार किसन कथोरे,नेत्ररोग तज्ञ, पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, न्यूज १८ लोकमतचे संपादक मंदार फणसे,डॉ. हॉस्पिटलचे मुख्य डॉ.अमोल गित्ते,तानसा मठाधीपती आलोकनाथ महाराज, योगी फुलनाथ महाराज, जिजाऊ सामाजिक, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष निलेश सांबरे,मोनिका पानवे, सांबरे यांचे आई वडील विमल व भगवान महादेव सांबरे यांच्या हस्ते विविध दालनांचे उद्घाटन करण्यात आले.

प्रसंगी उपस्थित जनसमुदायाला डॉ. लहाने यांनी आरोग्या विषयक महत्वाचे मार्गदर्शन केले. प्रास्तावीक निलेश सांबरे यांनी तर सूत्रसंचालन अमर राऊत, करुणा गगे यांनी केले.




## वाचकांचे पत्र

प्रति,
मी आपला पेपर नियमित वाचतो. आजच्या पेपर मध्ये विज बिल थकबाकीदारांना सरकारचे अभय ही बातमी आपण छापून वीजबिलाच्या अभय योजनेची जनजागृती केलीत. ही नक्कीच नागरिकांना उपयोगी पडेल. थकबाकीदार याचा आवर्जून लाभ घेतील.
धन्यवाद.

आपला वाचक
सुधीर सावंत

## श्रीमद्भगवद्गीता



श्रीमद भगवतगीता हे हिंदूंच्या सर्वात पवित्र ग्रंथांपैकी एक आहे. महाभारतानुसार भगवान श्रीकृष्णाने कुरुक्षेत्र युद्धात अर्जुनाला गीतेचा संदेश सांगितला. हे महाभारतातील भीष्मपर्वात दिलेले उपनिषद आहे. भगवद्गीतेत एकेश्वरवाद, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग याविषयी अतिशय सुंदर चर्चा केली आहे.

श्रीमद भगवद्गीतेची पार्श्वभूमी महाभारताच्या युद्धाची आहे. ज्याप्रमाणे सामान्य माणूस आपल्या जीवनातील समस्यांमध्ये अडकतो आणि जीवनातील समस्यांशी लढण्याऐवजी तो त्यापासून दूर पळून जाण्याचा निर्णय घेतो, त्याचप्रमाणे महाभारताचा महानायक त्याच्यासमोरील समस्या, जीवन आणि क्षत्रिय यांच्याशी लढण्याचा प्रयत्न करताना अर्जुन घाबरतो आणि क्षत्रिय धर्मापासून निराश होतो. अर्जुनाप्रमाणे धर्माविषयी भ्रमनिरास झालेले आपण सर्वजण कधी कधी अनिर्णयतेच्या स्थितीत निराश होतो किंवा आपल्या समस्यांमुळे विचलित होऊन पळून जाण्याचा प्रयत्न करतो.

म्हणूनच भगवान श्रीकृष्णाने हे महान ज्ञान गीतेद्वारे सर्वसामान्यांना विवेकी मार्ग दाखवण्यासाठी मांडले आहे. आम्ही तुमच्यासाठी संस्कृत श्लोकांच्या सोप्या मराठी भाषांतरासह सर्व १८ अध्याय प्रकाशित करत आहोत, जेणेकरून तुम्ही ते सहज वाचू शकाल.भारतीय संस्कृतीमध्ये गीता याचे स्थान इतके महत्त्वाचे आहे की याला योगोपनिषद किंवा गीतोपनिषद म्हटलं जातं.

आम्ही येथे संपूर्ण श्रीमद्भगवद्गीता अर्थात अध्याय १ ते अध्याय १८ चे मूळ श्लोक अर्थासहित उद्यापासून सुरु करत आहोत.

कबीर वचन

# तन को जोगी सब करै मन को करै न कोय...



कबीरांची दृष्टी ईश्वरावर परम प्रेम करणाऱ्या संतांची आहे. ही दृष्टी ईश्वरप्रेमाला बाधक ठरणाऱ्या ढोंगी साधूंच्या वृत्तीतील विचार-विखार सजगपणे उघड करून समाजासमोर मांडते आणि त्या पलीकडं जाऊन सर्व जीवमात्रांतील प्राणतत्त्व एक असल्याचंही साधकांना दाखवते. कबीरांचा विशेष असा आहे की, ते साधूंच्या उक्ती आणि कृतीतील, राहणी आणि विचारसरणीतील आणि दृश्य तना-मनातील भेद अत्यंत तीव्रतेनं आपल्या या दोह्यांतून व्यक्त करतात. अशा वेळी भरपिकातील तणाची कापणी करणाऱ्या कोयत्याची धार त्यांच्या शब्दांना येते.

ढोंगी साधूंच्या दांभिकपणाची, खोटेपणाची, मान मिरवण्याच्या वृत्तीची, समाजात अनर्थ निर्माण करणाऱ्या बुद्धीची चीड त्यांच्या शब्दांतून, प्रतिकांतून आणि कथनाच्या रीतीतून आपल्यापर्यंत पोहोचते. आपण जसे नाहीत तसं जाणीवपूर्वक दाखवण्याच्या वृत्तीचा सखोल अभ्यास करून ती दूर सारल्याशिवाय अध्यात्माच्या वाटेवरून कुठलाही साधक चालू शकत नाही, हे कबीरांचं हिताचं सांगणं आहे. ते म्हणतात...

**मन मैला तन ऊजरा,**
**बगुला कपटी अंग।**
**तासो तो कौवा भला,**
**तन मन एकहि अंग।।**

आपण पाहतो की, बगळ्याचा रंग पांढरा शुभ्र असतो. तळ्यांतल्या एका ओल्या खडकावर निश्चल बसून त्याचं डोळे मिटून चाललेलं ध्यान हे खरं ध्यान नसतं. शांत तळ्यातली एखादी मासळी पाण्याच्या पृष्ठभागावर आली की निमिषार्धात ती चोचीत धरून गिळता यावी, यासाठीच हे त्याचं ध्यानाचं ढोंग असतं.

खऱ्या ध्यानात असं ढोंग नसतं, स्वार्थ साधण्यासाठीचा अभिनय नसतो. बगळा वरून दिसायला पांढरा असला, तरी त्याचा हेतू शुद्ध नसतो. त्याचं मन स्वार्थीपणानं मळलेलं असतं. कबीर म्हणतात, या ढोंगी बगळ्यापेक्षा आत-बाहेरून एकच रंग असलेला कावळा बरा. कारण त्याच्या तना-मनाच्या रंगांत अंतर नसतं. एकाच रंगासारखी त्याची वृत्ती आतून-बाहेरून एकच असते. दोन पक्ष्यांच्या या रंगभेदातून दिसणं आणि असणं यातला फरक कबीर किती परिणामकारकतेनं व्यक्त करतात!

**तन को जोगी सब करै,**
**मन को करै न कोय।**
**सहजै सब सिधि पाइये,**
**जो मन जोगी होय।।**

कबीर म्हणतात, तथाकथित साधू आपला वेष बदलतात. गळ्यात, मनगटावर रुद्राक्षांच्या माळा घालतात. कपाळावर, दंडावर भस्माचे पट्टे ओढतात. हे या साधूंचं बाह्यदर्शन असतं. ते आपल्या देहाच्या दृश्याकारासाठी स्वतःला क्लेशही करून घेतात. व्रतं, उपवास करतात आणि प्रसंगी कंदमुळं खाऊन राहतात. कमीत कमी सुख-सोयींचा आधार घेऊन देह जगवतात. देहाच्या इच्छा शम-दमानं नियंत्रित करण्यात कधी कधी यश मिळवतात. अशा साधूंना फक्त देहभाव उमजलेला असतो. पण, मनोगती कळली नाही तर भक्तिभाव उमजत नाही, असं मार्मिक सूचन कबीर करतात.

मनोगती कळणाऱ्या साधूंना सर्व सिद्धी प्राप्त होतात, सर्व सुखं लाभतात. पण, त्यासाठी त्यांना एखाद्या योगी पुरूषाची संगती लाभावी लागते. तरच त्यांचं तन आणि मन सहज अनासक्त होऊन जीवन मंगलमय होतं. ढोंगी साधूंच्या जीवनाविषयीची ही निरीक्षणं नोंदवताना, त्यांचे वृत्ती-विशेष कथन करताना साधकानं कोणती काळजी घ्यायची, याबाबत कबीर अत्यंत तळमळीनं सांगतात...

**भेष देख मत भूलिये,बूझि लीजिये ज्ञान।**
**बिना कसोटी होत नहि,कंचन की पहचान।।**


आपल्या आसपास कितीतरी ढोंगी साधूंचा, स्वघोषित साक्षात्कारी पुरुषांचा, चमत्कारी बाबांचा, संमोहित करणाऱ्या तथाकथित गुरुंचा आणि इंद्रिय सुखांची क्षणजीवी प्रलोभनं दाखवणाऱ्या संधिसाधूंचा वावर आहे. मन भ्रांतीत हरवलं जाऊ शकण्याच्या या काळात आपण खरं साधुत्व कसं शोधणार? त्याचे खरे मापदंड कसे ठरवणार? खूप कठीण आहे हे! कारण आपल्या रोजच्या जगण्यातील व्यथा-वेदनांचा
विसर पाडणारा कुणी तथाकथित साधू आपल्याला जवळचा वाटू शकतो.

पण, हे वाटणं भ्रामक असू शकतं.

कबीर म्हणतात, आपल्याला आदर्श वाटणाऱ्या अशा साधूंना अनुसरण्यापूर्वी सोन्याप्रमाणेच त्यांची परीक्षा करायला हवी. सोन्याच्या शुद्धतेची पारख करणारं साधन आपल्याला ज्ञात असायला हवं. सोन्याचं वस्तुनिष्ठ मूल्य आपण जाणल्याशिवाय त्याचं धातू असणं त्याचा रंग, भावात्मक मूल्य आणि त्याच्या दागिन्यांची सुंदरता आपल्या दृष्टीला उमजेल कशी? सोनं हा शब्द म्हणजे सोनं नसतं.

कबीरांना सुचवायचंय की, फक्त शब्दांतून संमोहित करणाऱ्या साधूंपासून खऱ्या साधकांनी सदैव सावधान असलं पाहिजे. ही शब्दांपलीकडची सावधानता अनमोल आहे. कारण तीच 'असत'च्या अनुभवातून 'सत'चं दर्शन हृदयात पोहोचवणारी आहे.

## आजचे राशिभविष्य



**मेष**
संभाषणातून मार्ग काढाल. घरातील सदस्यांबद्दल चिंता असू शकते.मन प्रसन्न राहील.

**वृषभ**
दिवस शुभ आहे. सामाजिक क्षेत्रात तुमची व्याप्ती वाढेल. तुमचा आर्थिक भार कमी होईल.

**मिथुन**
जोडीदाराच्या पाठिंब्याने तुम्हाला काही मोठ्या कामात यश मिळेल. व्यवसायात फायदा होईल.

**कर्क**
कार्यालयात काम करताना घाई करू नका, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**सिंह**
व्यापारात आर्थिक प्रगती होईल. कौटुंबिक सदस्यांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**कन्या**
गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा.कौटुंबिक वातावरण चांगले राहील. नेतृत्व करण्याची क्षमता वाढेल.

**तूळ**
प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.कार्यक्षेत्रातील नवीन बदल आश्चर्यचकित करतील. कौटुंबिक मालमत्तेशी

**वृश्चिक**
संबंधित विवादाचे निराकरण होताना दिसेल. जोडीदाराचा सल्ला उपयुक्त ठरेल.

**धनु**
नातेवाईकाला किंवा मित्राला कर्ज देणे टाळा. पैसे परत मिळण्याची शक्यता कमी आहे.

**मकर**
प्रलंबित काम पूर्ण करण्याची संधी मिळेल. घरासाठी भौतिक वस्तूंची खरेदी कराल.

**कुंभ**
खिश्याची काळजी घ्या. कार्यालयात नवीन हक्क दिले जातील. कुटुंबियांशी वाद घालू नका.

**मीन**
कुटुंबाची तसेच आरोग्याची काळजी घ्या. धार्मिक कार्यात आपला सक्रिय सहभाग नोंदवाल.

# रेल्वेत जनरल डबे नेहमी पुढच्या किंवा मागच्या बाजूनेच का असतात?



आजकाल भरपूर लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी रेल्वेनं प्रवास करतात. रेल्वेचा प्रवास आरामदायक, वेळ वाचवणारा आणि कमी खर्चीक असतो. रेल्वेनं प्रवास करण्याचा आनंदही वेगळाच असतो. अनेकदा तुम्हीही रेल्वेनं प्रवास केला असेल. पण तुम्हाला कधी प्रश्न पडलाय का की, रेल्वेत जनरल डबे केवळ मागे आणि पुढेच का असतात? असा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर आज याचं उत्तर जाणून घ्या. रेल्वेकडून याबाबतचं प्लानिंग विचार करूनच केलेलं असतं. रेल्वेमध्ये वेगवेगळ्या श्रेणीचे डबे लावले जातात, तेव्हाही प्रवाशांची सुविधा आणि सुरक्षेची काळजी घेतली जाते.जनरल डबे मागे आणि पुढेच का? प्रत्येक रेल्वेचं स्ट्रक्चर जवळपास एकसारखं असतं. इंजिन सगळ्यात समोर आणि त्यानंतर जनरल डबा आणि मधे AC-3, AC-2 आणि स्लीपर कोच लावलेले असतात. रेल्वेच्या एका अधिकाऱ्याची माहिती दिली की, सामान्यपणे रेल्वेच्या जनरल डब्यांमध्येच सगळ्यात जास्त प्रवासी असतात. अशात रेल्वेचे डबे दोन टोकांवर लावल्यानं लोकांची गर्दी स्टेशनवर विभागली जाते. असं केलं नाही तर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर मधेच लोकांची जास्त गर्दी होईल. स्टेशनची पूर्ण व्यवस्था विस्कळीत होईल. जनरल डबे मधे ठेवले तर सिटींग अरेंजमेंटसोबत इतर व्यवस्थाही व्यवस्थित होणार नाही. यामुळे प्रवाशी त्यांचं सामान घेऊन एकीकडून दुसरीकडे जाऊ शकणार नाहीत. याच कारणाने जनरल डबे प्रवाशांच्या सोयीसाठी दोन कोपऱ्यांवर लावले जातात. इमरजन्सी रेल्वे एक्सपर्ट्सचं यावर मत आहे की, जनरल डबे रेल्वेच्या दोन्ही टोकांवर असणं सेफ्टीच्या दृष्टीनेही चांगलं आहे. असं केल्याने जनरल डब्यांमध्ये होणारी गर्दी अंतरामुळे दोन भागांमध्ये विभागली जाते. याने कोणत्याही आपातकालीन स्थितीत लोकांना रेल्वेतून बाहेर निघणं सोपं होतं.

# ही योगासने नक्की करून बघा



आजच्या व्यस्त जीवनशैलीत आपण अनेकदा आपल्या आरोग्याची काळजी घेणे विसरतो. अशा परिस्थितीत अनेक लोक दिवसभर ऑफिसमध्ये खुर्च्यांवर बसतात, ज्यामुळे वजन वाढण्यासारख्या अनेक समस्या उद्भवतात. सतत खुर्चीवर जास्त वेळ बसल्याने लठ्ठपणा, पायात सूज येणे, पचनाच्या समस्या आणि इतर आजार होतात. अशा स्थितीत तुमचे शरीर निरोगी राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम किंवा योगासने करणे महत्त्वाचे आहे. मात्र वेळेअभावी अनेकांना नियमित व्यायाम करता येत नाही. अशा परिस्थितीत ऑफिसच्या खुर्चीवर बसून तुम्ही हे योगासन करू शकता. चला जाणून घेऊया या चेअर योगा पोसबद्दल...

**१. चेअर बितिलासन**
हे आसन करण्यासाठी आधी खुर्चीवर बसावे. पाठीचा कणा सरळ ठेवा आणि दोन्ही पाय जमिनीवर ठेवा. तुमचे दोन्ही तळवे गुडघ्यावर किंवा मांडीवर ठेवा. यानंतर, दीर्घ श्वास घ्या आणि छाती बाहेरच्या दिशेने फुलवून घ्या . आता पाठीचा कणा वाकवा आणि खांदे मागे हलवा. यानंतर हळूहळू श्वास सोडताना पाठीचा कणा पोटाच्या दिशेने न्यावा आणि त्याला गोल करा. तुमची हनुवटी तुमच्या गळ्याला टेकवा आणि तुमचे खांदे आणि डोके पुढे वाकवा.

२. चेअर उर्ध्वा हस्तासन
हे आसन करण्यासाठी, श्वास घेताना, आपले दोन्ही हात छताच्या दिशेने वर करा. दोन्ही पायांमध्ये सुमारे १ फूट अंतर ठेवा. आता हात वरच्या दिशेने हलवताना खांद्याचे स्नायू पाठीकडे खेचण्याचा प्रयत्न करा. या व्यायामादरम्यान मांड्या आणि नितंबांचे स्नायू स्थिर ठेवा.

**३. चेअर गरुडासन**
चेअर गरुडासन करण्यासाठी, तुमची उजवी मांडी तुमच्या डाव्या मांडीवर ठेवा आणि तुमचे पाय क्रॉस करा. तसेच डाव्या पायाच्या वासराला उजव्या पायाच्या बोटाने गुंडाळण्याचा प्रयत्न करा. यानंतर, आपला डावा हात कोपरापासून उजवीकडे गुंडाळा आणि तळहातांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. आता दोन्ही कोपर वर करा आणि खांदे कानांपासून दूर नेण्याचा प्रयत्न करा. या आसनात ३-५ श्वास ठेवा. हाच व्यायाम दुसऱ्या हातानेही करा.

आरोग्य टिप्स

## नाश्त्यात जरूर खा उकडलेले हिरवे हरभरे



पोषणाचा खजिना हिरवा हरभरा, ज्याला छोलिया असेही म्हणतात, हे प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा खजिना आहे. व्हिटॅमिन ए, सी, के, फोलेट, लोह, मॅग्नेशियम, कॅल्शियम, पोटॅशियम आणि जस्त यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक त्यात आढळतात.

**हिरवा हरभरा खाण्याचे फायदेः**
१. शरीरात ताकद भरते
२ शरीर निरोगी ठेवते
३. पचन सुधारते
४. रक्तदाब नियंत्रित करते
५. प्रतिकारशक्ती वाढवते

# एकात्मिक ऊर्जा विकास योजना

शहरी भागातील वाढती ग्राहक संख्या तसेच आधुनिक जीवनशैलीमुळे विजेचा वाढता वापर लक्षात घेऊन या भागातील वीज वितरण प्रणालीच्या विस्तारीकरण आणि बळकटीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी केंद्र शासनाने सर्व राज्यांसाठी एकात्मिक ऊर्जा विकास योजना सुरू केली आहे.

शहरी भागातील वाढती ग्राहक संख्या, आधुनिक जीवनशैलीमुळे वीजेचा वाढता वापर यामुळे सद्यःस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या वीज वितरण प्रणालीचे विस्तारीकरण व बळकटीकरण करणे आवश्यक असल्याने शहरी भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याकरीता केंद्र शासनाने एकात्मिक ऊर्जा विकास योजना सर्व राज्यांकरीता सुरु केली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्यात महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येणार आहे. ही योजना महाराष्ट्रात राबविण्याकरिता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा प्रस्ताव दि. १९ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता त्यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :

शासन निर्णय -
केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजना महाराष्ट्र राज्यात खालीलप्रमाणे सुरु करण्यास शासन मान्यता देल आहे.

**एकात्मिक ऊर्जा विकास योजनेची उद्दिष्टे :**

१) शहरी भागातील वीज ग्राहकांना २४७ वीज पुरवठा करणे.

२) शहरी भागातील वीज वितरण प्रणालीचे राक्षमीकरण, श्रेणीवर्धन, बळकटीकरण करणे. बीज वितरण प्रणालीतील वीज हानीचे योग्य मोजमाप करण्यासाठी ऊर्जा अंकेक्षण महत्वाचे असल्याने यासाठी ग्राहकांकडील तसेच वीज वितरण रोहित्र फिडर यावर योग्य क्षमतेचे मीटर लावणे.

३) शहरी भागातील घरगुती, वाणिज्य व औद्योगिक ग्राहकांसाठी वीज जोडण्या देण्यासाठी लागणारी यंत्रणा उभारणे.

४) शहरी भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण/आधुनिकीकरण करणे.

५) सदर योजनेकरीता केंद्र शासनाकडून मंजूर प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के रक्कम अनुदान स्वरुपात मिळणार असून, प्रकल्प खर्चाच्या १० टक्के रक्कम महावितरण कंपनीने उपलब्ध करुन द्यावयाची आहे. उरलेली ३० टक्के रक्कम वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात घ्यावयाची आहे. तसेच केंद्र शासनाने नमूद केलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण केल्यास अतिरिक्त १५ टक्के पर्यंत वाढीव अनुदान (एकूण कर्ज रक्कमेच्या ५० टक्के) केंद्र शासनाकडून मिळणार आहे.

६) केंद्र शासनाने एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत देशपातळीवर रु. २२५१२ कोटींची तरतूद केलेली आहे. या योजनेसाठी पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (PF)यांची नोडल एजन्सी माजून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

७) केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील ३५ जिल्ह्यांकरिता एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत रु. २३००.४३ कोटी इतक्या रक्कमेचे ४५ सविस्तर प्रकल्प अहवाल (ऊें) जिल्हा विद्युत समिती सदस्यांबरोबर विचारविनिमय करुन तसेच तांत्रिकदृष्या व आर्थिकदृष्या आवश्यक व्यवहार्यता तपासून तयार करण्यात आले आहेत व त्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे.

८) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सूचित केल्यानुसार दि. २/६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हानिहाय 'जिल्हा विद्युत समिती' जिल्हयातील ज्येष्ठ खासदाराच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. सदर योजनेथे डीपीआर बनविताना सदर समितीशी विचार विनिमय करण्यात येईल व योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येतील.

९) सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र शासन, मे. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) व महावितरण यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. सदर योजनेच्या अनुषंगाने तसेच महावितरण व महापारेषण कंपनीच्या माध्यमातून सर्व राज्य व केंद्रस्तरीय योजनांतर्गत विद्युत पायाभूत सुविधा व उपकेंद्राकरीता, राज्यातील शहर व ग्रामीण क्षेत्रात शासकीय जागा नाममात्र शुल्कात उपलब्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यास तसेच जेवढा निधी सदर शासकीय जागेकरिता भरावा लागणार आहे, त्याऐवजी तेवढया निधीतून विद्युत पायाभूत सुविधा त्या शहरात वा त्या जिल्हयात वाढवून देण्याच्या अटीवर, शासकीय जमिनी दीर्घ कालावधीसाठी नाममात्र भाडेपट्टयाने संबंधीत कंपनीस उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.



# नैना प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी सिडकोच्या हालचालींना वेग




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**नवी मुंबई** : ११ वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्यासाठी सिडको महामंडळाच्या हालचालींना वेग आला आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या सहकार्य आणि सहभागाची गरज असल्याचे मत सिडकोने मंगळवारी प्रसिद्धी पत्रक काढून जाहीर केले. यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन नव्या वर्षात नैना प्रकल्पाची वीट रचली जाईल अशी चिन्हे निर्माण झाली आहेत.

दोन दिवसांपूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर पहिल्या व्यावसायिक विमानाची यशस्वी चाचणी घेतल्यानंतर सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी १७ एप्रिलला विमानतळ सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला. याचवेळी विमानतळाशी सलग्न असणाऱ्या नैना प्रकल्पाची कामे लवकरच सुरू केली जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नैना क्षेत्रात पनवेल तालुक्यातील ९२ तर उरणमधील दोन अशा ९४ गावांचा समावेश आहे. १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे बंधणकारक केले आहे. हीच बांधकाम परवानगी मिळविण्यासाठी खर्चिक व डोकेदुखी ठरणारी प्रक्रिया असल्याने नैना क्षेत्रातील शेतकरी वैतागले आहेत.

मागील ११ वर्षात या परिसरात नैना प्राधिकरणाने कोणतीही सुविधा न दिल्याने शेतकरी संतापले आहेत. नैना हे देशभरातील गुंतवणूकदार आणि भागधारकांसाठी आकर्षणाचे केंद्र असले तरी येथील शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी सिडकोने पुढाकार घेतला आहे.

या परिसरातील अवैध बांधकामांमुळे काही प्रमाणात संभ्रम निर्माण झाल्याने मंगळवारी सिडकोने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात संबंधित संभ्रम दूर करण्यासाठी नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे या विभागांतील अधिकाऱ्यांना सक्रिय केल्याचा दावा सिडकोने केला.

नैना प्रकल्पाच्या धोरणानुसार नगर रचना परियोजनेअंतर्गत लँड पूलिंग मॉडेलद्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीनमालकांना मिळणार आहे. शेतकऱ्यांचे विस्थापन टाळण्यासाठी हे मॉडेल सिडकोने आणले आहे. बहुतेक शेतकऱ्यांचे अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आल्याचा दावा सिडकोने केला आहे

# राज्यातील १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच, पुणे, सातारा जिल्हाधिकारीही बदलण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव व्ही. राधा यांच्या आदेशाचे पत्र जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार, मिलिंद म्हैसकर यांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी कार्यभार देण्यात आला आहे. तर, वेणुगोपाल रेड्डी यांना उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि वन विभागाच्या अतिरिक्त सचिवपदी जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच, पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, सातारा जिल्हाधिकारीपदी संतोष पाटील यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यातील १२ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यामध्ये २ महिला अधिकारी आहेत. तर, सातारा व पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी बदलण्यात आले आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांना पदोन्नती देत भूमी अभिलेख विभागाच्या जमाबंदी आयुक्तपदी करण्यात आली आहे. तर, पुणे झेडपीचे सीईओ संतोष पाटील यांना साताऱ्याचे जिल्हाधिकारी नियुक्ती दिली आहे. तसेच, साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आता पुण्याचे जिल्हाधिकारी असणार आहेत.

## १२ अधिकाऱ्यांच्या बदल्या, कुणाला कुठे पदभार

१. मिलिंद म्हैसकर अतिरिक्त मुख्य सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव (वने), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. बी. वेणुगोपाल रेड्डी अतिरिक्त मुख्य सचिव (वने), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. विकास चंद्र रस्तोगी प्रधान सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग., मंत्रालय, मुंबई यांना प्रधान सचिव (कृषी), कृषी आणि ADF विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

४. आय ए. कुंदन प्रधान सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांची प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

५. विनिता वैद सिंगल प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रधान सचिव, पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

६. डॉ.हर्षदीप कांबळे यांना प्रधान सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

७. डॉ. निपुण विनायक प्रकल्प संचालक, ॅळईं, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांना सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे.

८. जयश्री भोज व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई यांची सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

९. डॉ. सुहास दिवसे जिल्हाधिकारी, पुणे यांची सेटलमेंट कमिशनर आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१०. श्री.एच.एस.सोनवणे यांची नियुक्ती आयुक्त, क्रीडा आणि युवक, पुणे म्हणून करण्यात आली आहे.

११. श्री संतोष पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची जिल्हाधिकारी, सातारा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे

१२. श्री जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी, सातारा यांची पुणे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# मांजराच्या निर्बिजीकरणात मीरा भाईदर महापालिका राज्यात अव्वल

### पालिका प्रशासनाकडून भटक्या श्वानासोबतच मंजरांच्या निर्बिजीकरणाचा उपक्रम

----------------

### तीन महिन्यात ७८ मांजरावर यशस्वी शस्त्रक्रिया




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**भाईंदर** : मिरा भाईंदर शहरात भटक्या श्वानासोबतच मांजरांचे निर्बिजीकरण प्रशासनाकडून हाती घेण्यात आले आहे. मागील तीन महिन्यात ७८ मांजरावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तर मांजराचे निर्बिजीकरण करणारी राज्यातील पहिली महापालिका असल्याचा दावा प्रशासनाचा दावा आहे.

मिरा भाईंदर शहरात जवळपास दहा हजाराहून अधिक मोकाट फिरणारी मांजरे आहेत. प्रामुख्याने ही मांजरे मासळी बाजार, चिकन शॉप, उद्यान, मैदान आणि गृह संकुल परिसर आवारात अधिक प्रमाणात दिसून येतात. वाढत्या मांजराच्या संख्येमुळे नागरिकांना विविध त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यात मांजरांमुळे पसरणारी दुर्गंधी आणि धावत्या वाहनाखाली पिल्याच्या येण्याचा त्रास सर्वाधिक आहे.

त्यामुळे शहरातील भटक्या श्वानाची संख्या आटोक्यात आण्यासाठी त्यांचे निर्बिजीकरण करण्यात येत असताना त्यात मांजराचाही समावेश करण्याचा निर्णय प्रशासनाने पाच वर्षांपूर्वी घेतला होता.मात्र यंत्रणाचा अभाव असल्यामुळे प्रत्यक्ष या नियमांची अंमलबजावणी होत नव्हती.

मिरा भाईंदर शहरात मांजराचे निर्बिजीकरण करण्यासाठी पशु प्रेमी स्वतः मोकाट मांजराना दवाखान्यात घेऊन येत आहेत.यामुळे आता पर्यंत दवाखान्यात आलेल्या ७८ पैकी ७८ अशा शंभर टक्के मांजरावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया पार पडली आहे.एका मांजरावर शस्त्र क्रिया केल्यानंतर उपचारासाठी पाच दिवसाचा कालावधी लागत असल्याची माहिती पशु संवर्धन अधिकारी विक्रम निराटले यांनी दिली आहे.

> मिरा रोडच्या पूनम सागर परिसरात महापालिकेने पशु वैद्यकीय दवाखाना सुरु केला आहे.यात मांजराचे निर्बिजीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली उपकरणे बसवण्यात आली आहेत.त्यानुसार सप्टेंबर ते डिसेंबर अशा तीन महिन्यात प्रशासनाने एकूण ७८ मांजराचे निर्बिजीकरण केले आहे.तर येत्या दिवसात उत्तन येथे मांजरासाठी नवे निर्बिजीकरण केंद्र उभारून कामास गती देणार आहोत.
>
> - विक्रम निराटले
> पशुसंवर्धन अधिकारी
> मीरा भाईंदर महानगर पालिका

### उत्तन परिसरात श्वान निर्बिजीकरण केंद्र

८ हजार ९९३ श्वानाचे निर्बिजीकरण

मिरा-भाईंदर महापालिकेकडून उत्तन परिसरात श्वान निर्बिजीकरण केंद्र उभारण्यात आले आहे.या केंद्रात जवळपास १०० श्वानांवर एकाच वेळी उपचार करण्याची क्षमता आहे. त्यानुसार मागील दोन वर्षात याठिकाणी ८ हजार ९९३ भटक्या श्वानाचे निर्बिजीकरण करण्यात आले असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.एका श्वानाचे निर्बिजीकरण करण्यासाठी पाच ते सात दिवसाचा कालावधी लागतो.




# पालिकेतील सफाई कामगारांच्या मागण्यांकडे नमुंमनपाचे दुर्लक्ष

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : स्वच्छ भारत अभियानात नवी मुंबई महानगर पालिकेची मान उंचावणारे सफाई कामगार समान काम-समान वेतन मिळावे म्हणून २८ डिसेंबरपासून उपोषणाला बसले आहेत. मात्र उपोषणाला पाच दिवस झाले तरी मनपा प्रशासनाने उपोषणाची दखल न घेता कामगारांच्या मागण्यांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे या सफाई कामगारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेत कार्यरत कामगारांना समान काम समान वेतन मिळावे, ही कामगारांची मागणी आहे. ह्या मागणीसाठी वारंवार आंदोलने, मोर्चे काढण्यात येत आहेत. याबाबत नगर विकास खात्याने देखील अधिनियमातील तरतुदी आणि नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश सप्टेंबर २०२४ ला दिले आहेत. त्यानुसार समान काम समान वेतन धोरण ठरविण्यासाठी मनपा आयुक्तांनी समिती स्थापन करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. समितीच्या अहवालानुसार समान काम समान वेतन धोरणानुसार वेतन दिल्यास कामगारांचे वेतन कमी होईल असा निष्कर्ष काढला आहे.

याचा निषेध नोंदविण्यासाठी आणि कामगारांच्या मागणीप्रमाणे २००७ साली नियुक्त कायम कर्मचाऱ्यास आज रोजी मिळणारे वेतन सर्व विभागातील कामगारांना मिळावे .या मागणीसाठी प्रथमतः शुक्रवार २७ डिसेंबर रोजी समता समाज संघटनेमार्फत मनपावर भव्य मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा काढून देखील मनपाने दखल न घेतल्याने कामगारांनी अखेर शनिवार २८ डिसेंबरपासून आमरण उपोषण पुकारले आहे. मात्र १ जानेवारी उजाडले तरी देखील या कामगारांची मनपाने दखल घेतली नसल्याने कामगारांनी नाराजी व्यक्त केली आहे, अशी माहिती संघटनेचे सरचिटणीस मंगेश लाड यांनी दिली.

# केडीएमसीच्या अतिरिक्त पाणी प्रस्तावाला मंजुरी द्या - माजी आमदार नरेंद्र पवार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

कल्याण : वाढत्या नागरीकरणामुळे महापालिकेच्या पाणी कोट्याबाबत प्रचंड चिंता निर्माण होत असून पुढील काळात पाणी प्रश्नावरून लोकप्रतिनिधी, महापालिका प्रशासन व नागरिक असा संघर्ष दिसून येऊ शकतो. हा संघर्ष टाळण्यासाठी व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी, मोरबे धरण कार्यान्वायीत झाल्यानंतर उल्हास नदीतील नवी मुंबई महानगरपालिकेच्या नावे एम. आय. डी. सी. कडे मंजूर असलेला १४० दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण डोंबिवली महापालिकेला वर्ग करण्यात यावा. यानुसार सदरचा १४० दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण डोंबिवली महापालिकेस वर्ग केल्यास भविष्यात पाण्यासाठी होणारा संघर्ष टाळता येईल व नागरिकांना दिलासा मिळेल. याबाबत राज्य शासनाकडे प्रलंबित कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अतिरिक्त पाणी आरक्षणाला तात्काळ मंजुरी देण्याची महत्वपूर्ण मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.



> “ मोरबे धरण कार्यान्वायीत झाल्यानंतर उल्हास नदीतील नवी मुंबई महानगरपालिकेच्या नावे एम. आय. डी. सी. कडे मंजूर असलेला १४० दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण डोंबिवली महापालिकेला वर्ग करण्यात यावा. यानुसार सदरचा १४० दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण डोंबिवली महापालिकेस वर्ग केल्यास भविष्यात पाण्यासाठी होणारा संघर्ष टाळता येईल
>
> ❍ नरेंद्र पवार, माजी आमदार कल्याण (पश्चिम)

कल्याण डोंबिवली महापलिकेस उल्हास नदी व काळू नदी हे प्रमुख पाण्याचे स्तोत्र असून महापलिकेस उल्हास नदीतून ३२० दश लक्ष लीटर व काळू नदीतून ४. ५ दश लक्ष लीटर प्रतिदिन असा एकूण ३२४ दश लक्ष लीटर पाणी कोटा मंजूर आहे. सध्यस्थितीत उल्हास नदी व काळू नदीतून महापालिका अनुक्रमे सुमारे ३६५ दश लक्ष लीटर व ५ दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी उचलून कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३७० दश लक्ष लीटर पाणी पुरवठा करावा लागत आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रात माहे जून २०१५ पासून नव्याने समाविष्ट केलेल्या २७ गावांकरीता एम. आय. डी. सी. सध्या मंजूर कोटा १०५ दश लक्ष लीटर प्रतिदिन पैकी ५५ दश लक्ष लीटर इतकेच पाणी उपलब्ध होत आहे. सन २०२३ ते २०२४ अखेर कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये (२७ गावांसह) एकूण ४२५ दश लक्ष लीटर प्रतिदिन पाणी पुरवठा केला जात आहे. तथापी उल्हासनदीधून मंजूर पाणी कोट्यापेक्षा जास्त पाणी उचलत असल्यामुळे राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून महापालिकेला दंडनीय रक्कम आकारणी केली जात आहे. दरम्यान गुरुवारी पार पडलेल्या राज्यमंत्री मंडळाच्या पहिल्या बैठकीच्यावेळी निवेदनाद्वारे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हि महत्वपूर्ण मागणी केली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सदर प्रलंबित प्रस्तावावर निर्णय घेण्याचे ठोस आश्वासन दिले.



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

सिद्धगड स्मारक समिती मुरबाड यांच्या वतीने ०१ जानेवारी २०२५ रोजी सिद्धगड क्रांतीस्थळी हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा वीर हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त देशभक्तीपर कार्यक्रमामध्ये जिल्हास्तरीय समुहगान स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये ठाणे व रायगड जिल्ह्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. समुहगान स्पर्धेमध्ये सौ. कमलताई किसन कथोरे कनिष्ठ महाविद्यालय म्हसा येथील विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले याप्रसंगी भिवंडी लोकसभेचे खासदार मा. श्री. सुरेश ( बाळयामामा ) म्हात्रे साहेब तसेच मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार मा. श्री. किसनजी कथोरे साहेब यांच्या उपस्थित विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी घोडविंदे सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. योगेश माळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदन केले.



३ जानेवारी
सावित्रीबाईंचा जन्मदिवस!
दै. ठाणे जीवनदीप वार्ता परिवाराकडून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

# काळा तलाव येथे शिवसेना फलकाचे अनावरण



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)

कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक २८ काळा तलाव येथे मुख्य रस्त्यावर शिवसेनेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. आमदार विश्वनाथ भोईर यांचे पुत्र तथा कल्याण जिल्हा युवासेना सचिव वैभव भोईर यांच्या हस्ते व शिवसेना उपशहर प्रमुख माजी नगरसेवक मोहन उगले, महिला आघाडी शहर संघटक नेत्रा उगले, विभाग प्रमुख अनंता पगार, उपविभाग प्रमुख दिगंबर ठाणगे, स्वप्नील मोरे, शाखा प्रमुख धर्मेंद्र भदोरीया, नितीन कदम, रितेश पावले यांच्या उपस्थितीत श्रीराम नगर व शक्ती चौक बेतुरकर पाडा येथे शिवसेना फलकाचे अनावरण करण्यात आले. तसेच सर्व शाखाप्रमुख, महिला आघाडी युवासेना, ज्येष्ठ नागरिक व शिवसैनिक यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन समारंभ पार पडला.

# ठाणे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

ठाणे जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत दि.७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे येथे महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) यांना निर्यात संबंधित योजना व उपक्रमांबद्दल माहिती देणे तसेच निर्यात तज्ज्ञांच्या मदतीने त्यांना मार्गदर्शन व सहकार्य प्रदान करणे हे या संमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

हे संमेलन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून विकास आयुक्त (उद्योग) आणि महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा सेल चे अध्यक्ष, राज्याचे निर्यात आयुक्त श्री.दीपेंद्र सिंह कुशवाह (भा.प्र.से.) उपस्थितांना मागदर्शन करणार आहेत.

# ठाणे जिल्ह्यात विविध क्रीडा उपक्रम राबविण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

ऑलिम्पिकमधील पहिले पदक विजेते कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्म दिन १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यान तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नविन खेळांविपयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करणे आणि जनतेत क्रीडाविषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी दि.१२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात यावे. तसेच महान क्रीडापटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर सन १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलँड येथील ऑलिंपिक स्पर्धेत स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक (कांस्य पदक) जिंकणाऱ्या महान कुस्तीपटू दिवंगत खाशाबा जाधव यांचे क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदान विचारात घेता राज्यासोबतच देशाचा गौरव वाढविणाऱ्या कामगिरीस सातत्याने उजाळा मिळावा यासाठी व त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा दरवर्षी 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा करण्यात यावा, असे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तसेच शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित व स्वंयअर्थसहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये शासकीय तसेच शासनमान्य खाजगी विद्यापीठे, एकविध क्रीडा संस्था/असोसिएशन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था/ मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनानिमित्त ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यानांचे तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.तसेच महाराष्ट्राचे, भारत देशाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेल्या ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन प्र.जिल्हा क्रीडा अधिकारी रूही शिंगाडे यांनी केले आहे.

# परिवहन महामंडळामध्ये मोफत नेत्र तपासणीचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

इंफिगो आय केअर हॉस्पिटल्स, बावधन, पुणेला सर्वसमावेशक नेत्रतपासणी शिबिर सुरू केल्याची घोषणा करताना आनंद होत आहे, ज्यामुळे शिबिर पुणे महानगर पालिका परिवहन महामंडळ कोथरूड , बाणेर, बालेवाडी डेपोच्या सर्व कर्मचारी सदस्यांना नेत्रसेवा सेवांचा लाभ घेण्याची अनमोल संधी मिळते. हे शिबिर ६ जानेवारी ते ८ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात येईल. अग्रगण्य नेत्र तज्ज्ञांच्या सहकार्याने, पुणे महानगर पालिका परिवहन महामंडळ कर्मचारी सदस्यांसाठी विविध प्रकारच्या नेत्रतपासणीची सुविधा देतील, ज्याचा उद्देश समाजात चांगली दृष्टी आणि एकूणच डोळयांच्या आरोग्याला चालना देण्याच्या उद्देशाने आहे. हा उपक्रम पीएमपीएल चे कर्मचाऱ्यांचे कल्याण्याचीं कटिबद्धता अधोरेखित करतो. सर्वसमावेशक नेत्रतपासणी शिबिरात व्हिज्युअल तीक्ष्णता चाचण्या, डोळयांच्या दाबाचे मूल्यांकन आणि पात्र नेत्ररोग तज्ज्ञांशी सल्लामसलत यासह सवलतीच्या दरात चष्मा व इतर सेवा प्रदान केल्या जातील. सहभागींना डोळयांची काळजी घेण्याच्या पद्धती आणि कोणत्याही आवश्यक फॉलो-अप उपचारांसाठी शिफारसी देखील मिळतील. 'चांगली दृष्टी राखण्यासाठी आणि डोळयांच्या गंभीर आजारांपासून बचाव करण्यासाठी नियमित नेत्रतपासणी महत्त्वपूर्ण आहेत,हे शिबिर व्यक्तींसाठी कोणत्याही खर्चाशिवाय तज्ञ नेत्रसेवा आणि सल्ला प्राप्त करण्याची एक विलक्षण संधी आहे.'असे पुणे महानगर पालिका परिवहन मंडळाचे अधिकारी गाजरे कोथरूड डेपो , सय्यद सर बाणेर डेपो , दिवाणजी बालेवाडी डेपो व इनफिगो आय केअर हॉस्पिटल बावधन चे केंद्रप्रमुख डॉक्टर साकेत दसरे व भास्कर हिवाळे यांनी केले.

सर्व कर्मचारी सदस्यांना सर्वसमावेशक नेत्र तपासणी शिबिरात उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, वय किंवा विद्यमान आरोग्य स्थिती विचारात न घेता. जेव्हा डोळयांच्या आरोग्याचा प्रश्न येतो तेव्हा लवकर तपासणी ही महत्त्वाची असते आणि या उपक्रमाचा उद्देश व्यक्तींना त्यांच्या दृष्टीच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यास सक्षम बनवणे हा आहे.

# जिल्हा उद्योग केंद्रामार्फत निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)

जिल्हा उद्योंग केंद्रामार्फत जिल्ह्यातील निर्यात प्रचालन कार्यशाळा ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वा.नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी दिली आहे. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या निर्देशानुसार 'राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाच्या जिल्हा हे निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्यात प्रचालन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.या कार्यक्रमास सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचाल न समितीचे सदस्य, निर्यात संबंधित कामकाज करणारे घटक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रशंसा

## दुर्गम, नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र विविध स्तरांवर प्रयत्नशील

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. नववर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केलेला गडचिरोली दौरा हा येथील नागरिकांच्या आयुष्यात सुख-समाधान आणण्यासह सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'एक्स'च्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वर्षाच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध विकासकामांची सुरूवात करतानाच सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला.गडचिरोली यापुढे महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नसून तो पहिला जिल्हा ठरण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच, याठिकाणी सुरू असलेल्या औद्योगिकीकरणामुळे इथल्या नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, अशी ग्वाही यावेळी दिली.गडचिरोलीच्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे.

## आत्मा मालिक ध्यानपीठ मोहिली - अघईत

# तीन दिवसीय ध्यान योग शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/वासिंद(प्रतिनिधी)

येथील मोहिली-अघई विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट(कोकमठाण) संचालित,आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात तीन दिवसीय ध्यान योग शिबिर संपन्न झाले.

आत्मा मालिक ध्यानयोग मिशन द्वारा , परमपूज्य सद्गुरू आत्मा मालिक माऊलीच्या कृपा आशिर्वादाने संत परिवाराच्या प्रेरणेतून तसेच समस्त विश्वस्त मंडळ व स्थनिक व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाने आत्मा मालिक ध्यानपीठ मोहिली - अघई




येथे तीनदिवसीय ध्यान योग शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात भजन, ध्यान साधन, हरिपाठ सत्संग , सदगुरू दर्शन व महाप्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी परमपूज्य सद्गुरु आत्म मालिक माऊलींच्या दिव्य सानिध्यात,संत परमानंद महाराज व समस्त संतानी मधुर वाणीने प्रवचन रुपी सेवा दिली. संत परिवाराच्या दिव्य सानिध्यामध्ये असंख्य साधक व आत्माप्रेमी भाविक तीन दिवसीय ध्यान योग शिबिराचा लाभ घेतला. सरत्या वर्षाला निरोप देत सत्संग समारोह असल्याने परमपूज्य सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या दिव्य सानिध्यामध्ये आत्मप्रेमी भाविकांना सुख-शांती करिता ध्यानसाधना करण्याचा योग प्राप्त झाला.

या शिबिरावेळी संत भारत माता संस्थेचे सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, आत्मा मालिक ध्यानपिठाचे कार्याध्यक्ष तथा विश्वस्त उमेश जाधव, विश्वस्त उदय शिंदे, मोहन शेलार, प्रकाश भट, प्रकाश गिरमे, विलासराव पाटील, अभिजित पाटील, अनंत गायकवाड, प्रवीण मोरे , भारत सलगर, अलोकनाथ महाराज, ह.भ.प गोधडे महाराज आदी प्रमुख अतिथीसह असंख्य देश - विदेशातील आत्मप्रेमी व भाविक उपस्थित होते.

यासाठी व्यवस्थापक प्राचार्य डॉ डी. डी. शिंदे, जनरल व्यवस्थापक उल्हास पाटील, सेवा व जनसंपर्क व्यवस्थापक गुलाब हिरे, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कैलास थोरात, आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य पंकज बडगुजर ,प्राध्यापक, विभाग प्रमुख सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत 'महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन' साजरा करण्यात आला. पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय असून हे देशातील आदर्श पोलीस दल असल्याचे प्रतिपादन राज्यपाल राधाकृष्णन यांनी केले. गोरेगाव येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, पोलीस जवान व निमंत्रित उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, मागील काही वर्षांमध्ये पोलीस दलातील आव्हाने वाढली आहेत. सागरी सुरक्षा, नक्षलवाद यांसारखे धोके आहेतच. त्याशिवाय सायबर सुरक्षा, युवकांमध्ये वाढती नशाखोरी आदी नव्या आव्हानांमुळे पोलिसांना अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. राज्य शासन पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर पोलीस भरती देखील होत आहे. यामध्ये महिलांची वाढती संख्या ही उल्लेखनीय बाब आहे. महाराष्ट्र पोलीस हे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्यांच्या अद्वितीय समर्पण, शौर्य आणि उत्कृष्टतेसाठी ओळखले जातात. या जबरदस्त दलाने दहशतवादी हल्ले, संघटित गुन्हे, टोळी युद्धे आणि बॉम्बस्फोट अशा असंख्य आव्हानांना सामोरे जात त्यांचा यशस्वी सामना केला असल्याचे राज्यपालांनी यावेळी नमूद केले. मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यात दहशतवाद्यांना पकडून देण्यासाठी गोळया झेललेल्या तुकाराम ओंबळे यांच्या शौर्याचे राज्यपालांनी विशेष कौतुक केले. अशा शौर्यांच्या माध्यमातून भारत कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नसल्याचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

एक गुन्हेगार पुढे टोळीचे रूप धारण करू शकतो, त्यामुळे अनधिकृत शस्त्रे, अमली पदार्थ यांना पायबंद घालून महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी नष्ट करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. २ जानेवारी १९६१ रोजी भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता. त्यामुळे २ जानेवारी हा दिवस पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो, अशी माहिती पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी प्रास्ताविकाद्वारे दिली. भयमुक्त वातावरण ठेवून सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरुवातीला राज्यपालांनी वर्धापन दिन संचलनाचे निरीक्षण केले व शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये राज्य राखीव पोलीस बल पथक, मुंबई पोलीस सशस्त्र दल पथक, मुंबई पोलीस महिला पथक, ठाणे शहर- लोहमार्ग पोलीस पथक, मुंबई पोलीस दंगल नियंत्रण पथक तसेच निशान टोळी सहभागी झाले होते. यावेळी विशेष संचलन आणि हर्ष परेड सादर करण्यात आली.तसेच पाईप बँड आणि सायलेंट आर्म ड्रिल ची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यावेळी महासंचालकांनी राज्यपालांना स्मृतिचिन्ह प्रदान केले.

# ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठयाच्या योजनांना गती देणार

## - पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

पाणीपुरवठा विभागातील प्रगतीपथावरील कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देत ग्रामीण भागातील जनतेला नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासंदर्भातील कामांना गती देणार असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. मंत्रालयातील दालनात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा पदभार श्री.पाटील यांनी स्वीकारला. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, या विभागाच्या योजना यापूर्वीही प्रभावीपणे राबविण्यात आल्या असून प्रगतीपथावरील योजनांसाठी आवश्यक निधी वितरित करण्यात येईल. पाण्याची कमतरता भासू नये यासाठी तांत्रिक बाबींचा आढावा घेऊन विविध कामांना गती देणार आहे. विभागाच्या माध्यमातून पाण्याची मूलभूत गरज पूर्ण करणे ही शासनाची प्राथमिकता असल्याचेही श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी -ॲड.मंगेश नेने

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

'वाचाल तर वाचाल... 'या वाक्यात दडलेला मार्मिक अर्थ उलगडून सांगत विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रंथालयाने वाचकांसाठी अनुकुल, पुरक वातावरण निर्माण केले असल्याचे सांगत ग्रंथालयातील सुसज्जतेसाठी ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले.

पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्घाटन!पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ सदानंद धारप, संस्थेचे सदस्य श्रीराम दातार, ग्रंथपाल जी. जी. जोशी, डॉ.देविदास बामणे विविध शाखांचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर



कर्मचारी उपस्थित होते.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विभाग यांच्या आदेशानुसार १ जाने ते १५ जाने या कालावधीत ग्रंथालय व भाषा विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पंधरवडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचे महत्त्व ठसविण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन, वाचनाचे महत्त्व सांगणारे बॅनर, वाचन सेल्फी पॉईंट आदीचा वापर करून ग्रंथालय सुशोभित करण्यात आले. प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद केले.महाविद्यालयातील विद्यार्थीनी पूर्वा राजे ही सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थिनीचा गौरव करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ देवीदास बामणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. पी. डी. पाटील यांनी केले.

## मंत्रिमंडळ बैठक निर्णय

# आकारी पड जमिनी मूळ खातेदारांना परत केल्या जाणार

## महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील सुधारणा विधेयक

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे ४ हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार आहेत. यामुळे छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबतचे सुधारणा विधेयक मांडण्यास मंजूरी देण्यात आली. तगाई किंवा तत्सम थकबाकी न भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारीपड म्हणून शासन जमा करण्यात येतात. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षाच्या आत भरणा केल्यास मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद नव्हती.

आता अशा जमिनी प्रचलित बाजारमूल्याच्या २५ टक्के रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० मध्ये करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तसे विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनांसाठी मुंबई जिल्हा बँकेत खाते उघडण्यास मान्यता

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीसाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाते उघडण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सन २०२४-२०२५ या वर्षासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बँक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली. तसेच निवृत्तीवेतनधारकांची वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरीता तसेच शासनाच्या सार्वजनिक उपक्रम , महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीकरीता बँकेस प्राधिकृत करण्यास देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र,घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail
-jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com